# उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग, रोहा यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र मु.पो.ता.रोहा, जि.रायगड. दु. क्र.:(०२१९४) २३५७५५ फॅक्स क्र. २३२६५५
Email:- dycfroha@mahaforest.gov.in / dcfroha@gmail.com

पत्र
RPAD

विषय:- वनजमिन रायगड.
मौजे शिरवणे, वाकळघर व कोंडीवली
ता.श्रीवर्धन येथील ३.४१५३ हे. क्षेत्र .
ॲप्रोचरोडसाठी हस्तांतरित करणेबाबत.

जा. क्र.अ/२०/जमिन/ ९२०९ /२०१६-१७.
रोहा, ४०२ १०९ दि.१३ /०७/२०१६.

प्रति,

श्री.रजनिकांत पाजवानी,
पोओऐ होल्डर,सनराईस मरीन
इंटरप्रायजेस, जिवन उदयोग बिल्डींग
तीसरा माळा,२७८ डी.एन.रोड, फोट
मुंबई - ४०० ००१.

संदर्भ :- १. अलतगे स्टोन क्रशिंग इंडिस्टिज आराठी पो व ता.श्रीवर्धन जि.रायगड यांचेकडील पत्र दि.०१.०६.२०१६.

२. उप वनसंरक्षक रोहा यांचेकडील वनसर्वेक्षक रोहा यांना दिलेले पत्र क्र.अ/२०/जमिन/ ७४९ दि.०३.०६.२०१६.

३. वनसर्वेक्षक रोहा यांचेकडील पत्र दि.३०.०६.२०१६ (जमिन कक्षाकडे प्राप्त दि.१२.०७.१६)

विषयांकित कामी मौजे शिरवणे,वाकळघर व कोंडीवली ता.श्रीवर्धन येथील ३.४१५३ हे. क्षेत्र ॲप्रोचरोडसाठी हस्तांतरित करणेबाबत वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव वरील संदर्भ क्र.०१ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांचेकडून १ प्रतीत या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. प्रकरणी वरील संदर्भ क्र.०२ अन्वये प्रस्ताव वनसर्वेक्षक रोहा यांचेकडे तपासणी पाठविण्यात आलेला होता त्याअनुषंगाने वरील संदर्भ क्र.३ अन्वये प्रस्तावाची त्रुटी काढून या कार्यालयास परत केलेला आहे.

सबब वनसर्वेक्षक रोहा यांनी काढलेल्या त्रुटी व या कार्यालयातून काढलेल्या त्रुटी खालीलप्रमाणे आहे.

१. प्रस्तावात केंन्द्रशासनाचे मार्गदर्शक सुचीप्रमाणे चेकलिस्ट सादर केलेली नाही. तरी परिपुर्ण व बिनचूक चेकलिस्ट सादर करावी व चेकलिस्ट मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींची पुर्तता करावी.
२. फॉर्म अ (Part-I) परिपुर्ण भरलेला नाही.
३. प्रस्तावामध्ये क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये (area statement) मध्ये स.नं. निहाय वनजमिन व त्यांचे क्षेत्र तसेच वनेत्तर जमिन व त्यांचे क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.
४. प्रकरणी वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्राचे ७/१२ उतारे आंग्लभाषेत सादर करावे.
५. प्रकरणी गट स्किम उतारे सामिल केलेले नाही.
६. प्रकरणी गट नं. निहाय संबंधित खातेदार यांचे संमतीपत्र सामिल केलेले नाही.
७. प्रकरणी किती व कोणत्या वृक्षाची तोड करावी लागणार आहे याची मोजदाद होऊन त्याची माहिती व अंदाजपत्राकसह सामिल करणे आवश्यक आहे.

८. प्रकरणी महाराष्ट्र खाजगी वन संपादन अधिनियम १९७५ सुधारित १९७८ चे कलम २२ अ अन्वये पुर्न:स्थापित क्षेत्राचे आदेश समाविष्ट केलेले नाही.
९. प्रकरणी हस्तांतरित होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात पर्यायी वनीकरण योजनेसाठी क्षेत्राचा तपशिल प्रस्तावात सामिल करणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे पर्यायी वनीकरणासाठी खर्चाचे अंदाजपत्रक Geo digital map अक्षांश रेखांशसह सादर करणे आवश्यक आहे.
१०. प्रस्तावात पान नंबर टाकलेले नाही.
११. FRA-२००६ ची पुर्तता करून प्रस्तावाबरोबर संलग्न करून ग्रामसभेचा नाहरकत दाखला समाविष्ट करणे आवश्यक आहे.
१२. रस्त्याबाबत Cross section plan समाविष्ट केलेला नाही.
१३. प्रस्तावात कमित कमी क्षेत्र वापराबाबत व याशिवाय दुसरे क्षेत्र उपलब्ध होत नसलेबाबत जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र समाविष्ट केलेले नाही.
१४. प्रकरणी बाबवार तपशिल (itemwise breakup) मध्ये परिपुर्ण माहिती भरून सादर करणे आवश्यक आहे.
१५. मौजे वाकळघर या गावामधील area statement मध्ये स.नं. चुकिचे नमूद केलेले आहे.
१६. मौजे वाकळघर मध्ये स.नं.३७/१(गट नं.२३५), ३७/४, ७ (२३३), ३७/१०(२३२), व ३७/१२(२२१) हे नंबर अभिलेखाप्रमाणे वनविभागाचे आहेत, परंतू area statement मध्ये सदरचे स.नं. मालकि क्षेत्र असे नमुद केलेले आहेत. त्यामुळे तेवढे क्षेत्र प्रस्तावामध्ये वाढवून सुधारित area statement तयार करणे आवश्यक आहे.
१७. मौजे वाकळघर ग.नं.२६० चा ७/१२ उतारा दिसुन येत नाही.
१८. मौजे वाकळघर गावं नकाशामध्ये स.नं./गट नंबर व लगत गावाची चर्तुसिमा चुकिच्या दिसून येत आहेत.
१९. मौजे शिरवणे गट नं.१९१ चा ७/१२ उतारा दिसून येत नाही.
२०. मौजे शिरवणे स.नं.११/० ऐवजी ६/० अशी नोंद area statement मध्ये चुकिचे नमूद केलेली आहे.
२१. मौजे शिरवणे मध्ये area statement मध्ये ॲप्रोचरोड लांबी सं.नं. निहाय दाखविणेत आलेली नाही व स.नं. चुकिचे नमूद केलेले आहेत.
२२. मौजे शिरवणे गट नंबर १२९ चा ७/१२ उतारा जोडलेला नाही.
२३. प्रकरणी सामिल करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती स्वाक्षांकित करणे आवश्यक आहेत, तसेच सर्व कागदपत्रे आंग्ल भाषेत भाषांतरित करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे त्रुटीची पुर्तता करून फेर प्रस्ताव केंन्द्रशासनाचे मार्गदर्शक सुचीप्रमाणे ६ प्रतीत या कार्यालयात सादर करावा. तसचे प्रस्तावाची १ प्रत वनक्षेत्रपाल श्रीवर्धन यांचेकडे सादर करावी.

सोबत :- मुळ प्रस्ताव.

उप वनसंरक्षक
रोहा वनविभाग, रोहा.

प्रत :- वनक्षेत्रपाल श्रीवर्धन यांना माहितीसाठी व उचीत कार्यवाहीसाठी रवाना.
२/- त्यांनी प्रकरणी समाविष्ट होणाऱ्या क्षेत्रात झाडांची मोजदाद करुन, वृक्ष तोडीस येणारे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन सहा. वनसंरक्षक, रोहा यांचेमार्फत या कार्यालयात तात्काळ सादर करावे. तसेच संपूर्ण क्षेत्रांत फिरती करुन त्या क्षेत्रांत RET प्रजाती आहे किंवा कसे याबाबत त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा. तसेच प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम १९८० चे तरतुदींचा भंग होणार नाही याची त्यांनी दक्षता घेऊन अहवाल या कार्यालयात सादर करावा.
प्रत :- वनसर्वेक्षक रोहा यांना माहितीसाठी व उचीत कार्यवाहीसाठी रवाना.